ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

VOLUME - VI ISSUE - IV OCTOBER - DECEMBER - 2017 AURANGABAD

| IMPACT FACTOR / INDEXING |
| --- |
| 2016 - 4.205 |
| www.sjifactor.com |

✢ EDITOR ✢

Assit. Prof. Vinay Shankarrao Hatole

M.Sc (Math's), M.B.A. (Mkt), M.B.A (H.R),
M.Drama (Acting), M.Drama (Prod & Dirt), M.Ed.

✢ PUBLISHED BY ✢

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

## EDITORIAL BOARD

Editor : Vinay Shankarrao Hatole

- **Dr. S. K. Omanwar**
  Professor and Head, Physics, Sat Gadge Baba Amravati University, Amravati.
- **Dr. Rana Pratap Singh**
  Professor & Dean, School for environmental Science, Dr. Babasaheb Bhimrao Ambedkar University, Raebareily Road, Lucknow.
- **Dr. Shekhar Gungurwar**
  Hindi Dept. Vasantrao Naik Mahavidyalaya Vasarni, Nanded.
- **Dr. P. A. Koli**
  Professor & Head (Retd.), Department of Economics, Shivaji University, Kolhapur.
- **Dr. S Karunanidhi**
  Professor & Head, Dept. of Psychology, University of Madras.
- **Prof. Joyanta Borbora**
  Head Dept. of Sociology, University, Dibrugarh.
- **Dr. Walmik Sarwade**
  HOD Dept. of Commerce Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad.
- **Dr. Manoj Dixit**
  Professor and Head, Department of Public Administration Director, Institute of Tourism Studies, Lucknow University, Lucknow.
- **Prof. P. T. Srinivasan**
  Professor and Head, Dept. of Management Studies, University of Madras, Chennai.
- **Dr. Shankar Ambhore**
  HOD Economics, Smt. Dankuwar Mahila Mahavidyalaya, Jalna.
- **Dr. P. Vitthal**
  School of Language and Literature Marathi Dept. Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded.
- **Dr. Jagdish R. Baheti**
  HOD, SNJB College of Pharmacy Neminagar, A/P. Tal. Chandwad, Dist. Nashik.
- **Dr. Sadique Razaque**
  Univ. Department of Psychology, Vinoba Bhave University, Hazaribagh, Jharkhand.
- **Prof. Ram Nandan Singh**
  Dept. of Buddhist Studies University of Jammu.
- **Dr. Gajanan Gulhare**
  Asst. Professor Sant Gadge Baba Amravati University, Amravati, Amravati.
- **Dr. Madhukar Kisanrao Tajne**
  Department of Psychology, Deogiri College, Aurangabad.

+ PUBLISHED BY +

**Ajanta Prakashan**

Jaisingpura, Near University Gate, Aurangabad. (M.S.) 431 004 (INDIA) Contact : (0240) 6969427, Cell : 9579260877, 9822620877 E-mail : anandcafe@rediffmail.com, info@ajantaprakashan.com, Website :www.ajantaprakashan.com

## CONTENTS



| Sr. No. | Name & Author | Pages |
|---|---|---|
| 13 | Planning and Implementing a Total Rewards System<br>Minakshi Soni | 72-78 |
| 14 | Legal Guidelines to Fight Vehicle Pollution Laws :- A Study<br>Mohan S. Gawai<br>Anil Kumar | 79-82 |
| 15 | SOS Children's Village - Next to Home<br>Dr. ChitraRajuskar<br>Swati Bhupal Kamble | 83-86 |
| | नटरंग – एका स्वप्नांचा प्रवास<br>अभिमन्यू राजगुरु | १-३ |
| २ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार व सामाजीक परीवर्तनाचे अर्थशास्त्र<br>प्रा. डॉ. सुभाष प्रभू राठोड | ४-१० |
| ३ | समकालीन हिन्दी दलित कहानियों में सामाजिक यथार्थ<br>विवेक जगन्नाथ पाखरे | ११-१२ |
| ४ | जागतिकीकरणाचा मराठी कवितेवरील प्रभाव<br>कैलास सुदामराव वानखडे | १३-१७ |
| ५ | नव्वदोत्तर मराठी दलित कविता : एक आकलन<br>प्रा. कांबळे डी. आर. | १८-२० |
| ६ | बलुतेदार सहकारी ग्रामोद्योग संस्थांमधील सभासदांच्या सामाजिक विकासात आर्थिक लाभांचे योगदान<br>प्रा. प्रकाश मांगीलाल राठोड | २१-२३ |
| ७ | जागतिकीकरणाच्या स्पर्शाने मावळली ग्रामसंस्कृती<br>प्रा.आनंदराव जाधव<br>डॉ. मनोहर सिरसाट | २४-२५ |
| ८ | संत तुकारामांच्या अभंगातून व्यक्त झालेला कर्मसिद्धांत<br>वाल्मीक भावराव गवळी<br>डॉ. मनोहर सिरसाट | २६-२९ |
| १ | पृथ्वीराज रासो की ऐतिहासिकता एवं प्रामाणिकता<br>डॉ. कल्पना वर्मा | १-३ |
| २ | हिंदी-अध्ययन में अन्य भाषाओं के प्रभाव की समस्याएँ<br>डॉ. संजय भाऊसाहेब दवंगे | ४-५ |

८

# संत तुकारामांच्या अभंगातून व्यक्त झालेला कर्मसिध्दांत

वाल्मीक भाऊराव गवळी

संशोधक विद्यार्थी

डॉ. मनोहर सिरसाट

मराठी विभाग (पदवी-पदव्युत्तर), कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, धारूर, जि. बीड

## प्रस्तावना

निसर्गाने मानवाला इतके सुंदर जीवन दिले परंतु जीवनाचा भावसागर तरूण जाताना इतका मोहग्रस्त होऊन जातो की, सुखालाच आपल्या जीवनाचे अंतिम लक्ष ठरवून, त्यासाठी सारखी धडपड करीत असतो. कर्माचे रहस्य बरोबर न समजल्यामुळे पुष्कळांचा कर्मशक्तीचा बराचसा भाग वाया जातो. याविषयी निरंतर कर्म करा पण त्यात आसक्त होऊ नका हे भगवतगीतेचे मूलसूत्रच आहे. अनासक्त होऊन कर्मासाठी कर्म करावे हा संदेशच श्रीकृष्णाने जगासमोर मांडला. मनुष्याला निष्क्रिय करणाऱ्या तमोगुणांचा नाश करून त्याला ध्येयाभिमुख बनवण्यासाठी, नवचैतन्य निर्माण करण्यासाठी तसेच सामाजिक दृष्टिकोन बदलून एक नवी सामाजिक स्थिती प्रस्थापित करण्यासाठी संत ज्ञानेश्वरापासून अनेक संत, महात्म्यांनी प्रयत्न केले. संत तुकारामांनी तर आपल्या अभंगवाणीतून मरगळणाऱ्या समाजाला कर्मयोगाचे महत्त्व सांगून विश्वकल्याणाचा दृष्टिकोण जगासमोर मांडला.

प्राचीन काळापासून वेदशास्त्रानुसार जीवनाचे चार आश्रमात विभाजन केलेले आहे. धर्मनितीविषयक ग्रंथात ब्रह्मचर्य, ग्रहस्थ, वानप्रस्थ व संन्यास या विविध आश्रमासाठी भिन्न-भिन्न प्रकारची कर्मे सांगितली गेली आहेत. कर्माबरोबरच धर्माव्यतिरिक्त काही कर्तृत्वाची पुर्तीही आपल्या जीवनात करावयाची असते. तुकोबांनाही गृहस्थाश्रम महत्त्वाचा वाटल्याने त्यांनी आपल्या अभंगातून गृहस्थ कर्मे स्पष्ट केली आहेत.

## तुकोबाच्या अभंगातून व्यक्त झालेली गृहस्थ कर्मे

प्रत्येक आश्रमाच्या अनुरोधाने जीवनाच्या प्रत्येक खंडासाठी काही विशिष्ट कर्तृत्वे ही वेदामध्ये आली आहेत. साहजिकच तुकोबांनी ही कर्तृत्वे कोणती आहेत व त्याचे पालन करणे समाजहित तसेच राष्ट्रहिताच्या दृष्टीने कशी महत्त्वाची असतात ते सांगताना चांगली कर्मे कसे परमेश्वराजवळ घेऊन जातात असे मांडताना तुकोबा म्हणतात,

"शांतरूपे नव्हे कोणाचा वाईट । वाढवी महत्त्व वडलांचे ।
तुका म्हणे हेच आश्रमाचे फळ.। परमपद बळ वैराग्याचे ।।

आपले जीवन परमेश्वराच्या सेवेसाठी आहे. त्यामुळे आपल्या वाड-वडिलांचे नाव निघते. हा रस्ताच आपल्याला ईश्वराकडे घेऊन जातो. गृहस्थाश्रम हा समाज जीवनाचा पाया आहे. कारण समाजातील लहान मुले-मुली, वृद्ध, स्त्रिया आदि सर्व गृहस्थावरच अवलंबून असतात. गृहस्थाचां अनेक कर्तव्ये असतात. परंतु तुकोबाच्या अभंगवाणीतून व्यक्त झालेली काही कर्तृत्वे महत्त्वाची वाटतात.

## आई-वडिलांची सेवा

सध्याच्या आधुनिक युगात एक महत्त्वाची समस्या समाजात रूढ होत चालली ती म्हणजे पैसा, संपत्तीच्या मागे लागलेला आहे. गृहस्थ जन्मदाता माता-पित्यांना वृद्धाश्रमात पाठवू लागला तो इतका मोहित झाला की, आपल्या हातून काय घडतेय ते त्याला समजेनासे झाले. ज्या आई-वडिलांनी आपल्या मुलांना तळाहाताच्या फोडाप्रमाणे जपले तेच आयुष्याच्या संध्याकाळी सेवा करायला विसरू लागलेत स्वामी विवेकानंदानी ह्या विषयी सांगतात,

'मातरं पिरतश्चैय साक्षात प्रत्यक्ष देवताम ।
मत्त्वा गृही निषेवेंत सदा सर्वप्रयत्नत ।।' (कर्मयोग - स्वामी विवेकानंद)

ज्यांनी आपल्याला हे सुंदर जग दाखविले त्या माता व पिता देवता समजून गृहस्थाने सर्वदा सर्वप्रकारे त्यांची सेवा करून प्रसन्नता संपादन करावयास हवी. आई-बाप संतुष्ट झाले तर त्या व्यक्तीवर परमेश्वरही प्रसन्न होत असतो पण उतारवयात काठी बनून फिरण्यापेक्षा आजचा गृहस्थ वृद्धाश्रमाची वाट दाखविण्यास सुद्धा मागेपुढे पाहत नाही. ही वस्तुस्थिती आहे. स्वामीजी म्हणतात जो आईबापांना कधी कडू व कठोर शब्दांनी दुखवित नाही तोच खरा सुपुत्र, माता, पिता, पुत्र, बंधु पत्नी यांच्या अन्नवस्त्राची पर्वा न करता जो गृहस्थ स्वतःचेच उदरभरण करतो तो पापाचा वाटेकरी होतो. संत तुकाराम स्पष्ट करतात की, विठ्ठल पुंडलिकांकडे आला तो त्याची मातृपितृभक्ती पाहून पुंडलिकाने जर आपल्या आई-वडिलांकडे दुर्लक्ष करून देवाच्या चरणी लोळण घेतले असते, तर कदाचित त्याला त्या परीक्षेत अनुत्तीर्ण केले असते. म्हणून तुकोबा म्हणतात आपल्या आई वापानांच काशी समजा, त्यांची सेवा करा तुकोबा आपल्या अभंगातून म्हणतात -

"मापबापे केवळ काशी । तेणे न वजावे तीर्थासी ।
पुंडलिके काय केले । परब्रह्म उभे केले ।।धृ ।।

**उत्तम व्यवहार**

मनुष्याने गृहस्थाश्रमात प्रवेश केल्यानंतर त्या गृहस्थाचे प्रथम कर्तृत्व म्हणजे जीविकोपार्जन आताच्या धकाधकीच्या काळात पैसा, संपत्ती, कमीत-कमी दिवसांमध्ये, कमी श्रमात कमावण्यासाठी माणूस वाटेल ते करावयास तयार होतो. कमी श्रमात त्याला सुख, समाधान ऐश्वर्य हवे असते. समाजातील अशा रूढ पावत जाण्याला स्थितीविषयी तुकोबा अभंगात भाष्य करतात,

"जोडुनिया धन उत्तम व्यवहारे । उदास विचारे वेच करा ।
उत्तमच गती तो एक पावेल । उत्तम भोगील जीवखाणी ।।"

व्यवहार करत असता माणसाला कर्तृत्वाचा विसर पडून चालला आहे. तो खोटे-नाटे बालून, फसवा-फसवी करून किंवा लांड्या-लवाड्या करून धनसंचयन करत असला तर तो पापाचा धनी होतो. पैसा हा गृहस्थाश्रमातील महत्त्वाचा भाग आहे. हे आर्य चाणक्यांनी त्यांच्या अर्थशास्त्र नामक ग्रंथातून मांडला आहे. त्यामुळे साहजिकच धनप्राप्ती हेच अनेकांचे उद्दिष्टे होऊन बसते पण अशा धन प्राप्तीसाठी सुयोग्य मार्ग अवलंबावा असे तुकोबानाही वाटते. म्हणून ते प्रतिपादन करतात की, जो करतो त्याला उत्तम गती प्राप्त होते. त्याने कमविलेल्या धनाचा उपयोग लोकोपयोगी कामासाठी उदा. पाणपोई, पशुधनाची जोपासना करणे अशाने गृहस्थाश्रमाची सार्थकता स्पष्ट होते व माणूस समाजात आदर्श बनतो. उदाहरणच म्हणून महात्मा फुले यांनी त्यांच्या संपत्तीचा उपयोग लोकोपयोगी कार्य करण्यासाठी कसा केला हे सर्वश्रुतच आहे. जोतीबा आपल्या अभंगात लिहितात -

'उद्योग जो करी दीनबंधूसाठी । ममता ती पोटी मानवाचा ।
विद्या सर्वा देई सद्गुणाची हाव । करी नित्य कीव । अज्ञानाची ।।२।।
(समग्र वाङ्मय - म. फुले, संपा. धनंजय कीर)

**परोपकार वृत्ती**

परोपकार हीच त्यांच्या कर्माची प्रेरणा आहे अशा काही सत्पुरूषाचे वर्णनही तुकोबा आपल्या अभंगवाणीतून व्यक्त करतता आपल्याला जे मिळाले ते इतरांनाही मिळावे त्यात काही वाटा दुसऱ्यांचाही असतो. संत एकनाथांनीही अशा काही धन्य महात्म्याला चंदनाची उपमा दिली आहे. चंदनाच्या झाडामध्ये अंगभूत असा सुगंध असतोच पण त्यामुळे त्यांच्या आसपास वाढलेली बोरीबाभळीची झाडेसुद्धा सुवासिक होऊन त्यांचाही गंध चंदनाप्रमाणे दरवळू लागतो. नाथ महाराज म्हणतात, "सर्वांगीण सुवास तो उगला न राहे । सभोवती तरूवर चंदन करीताचि जाये । (प्रसादाची वाणी अर्थात तुका म्हणे - डॉ. सदानंद मोरे)

अशा सत्पुरूषाची महत्ती सांगताना तुकोबा म्हणतात -

"उपकारी असे आरोनी उरला । आपुले तयाला पर नाही ।

लाभावरी घ्यावे सापडले काम । आपला तो श्रम न विचारी ।

इतरांसाठी कर्म करणारा कधी हा माझा, हा दुसऱ्यांचा असा भेदभाव मानत नाही अशी गृहस्थे दुसऱ्यावर उपकार करणे म्हणजे गोष्टी सर्वांच साधत असतात. समाजातील दुःख, भावना वेध घेण्याचा तो प्रयत्न करतात. स्वतः तुकोबारायांच्या कार्यामागील प्रेरणासुद्धा उपकाराचीच होती हे त्यांच्या उरलो उपकारापुरता, ह्या प्रसिद्ध वचनावरून स्पष्ट होते.

## चारित्र्य संवर्धन

गृहस्थाश्रमाचे कर्तव्ये पार पाडत असताना समाजमनात स्वतःचे स्थान बिंबवण्याचे काम व्यक्तीचे चारित्र्य करत असते. ज्याचे चारित्र्य चांगले त्यांच्याकडे लोकांचा बघण्याचा दृष्टिकोणही छान असतो. चारित्र्यशी व्यक्तीला समाज आदर्श मानत असतो. आजच्या स्थितीमध्ये आपल्याला बऱ्याच अंशी चारित्र्याचे अधःपतन झालेले दिसून येते. खून, दंगे, चोऱ्या, अपहरण, भ्रष्टाचार, स्त्रियांवरील अत्याचार यांचे प्रमाण वाढताना दिसते. चारित्र्य, निर्मितीवरच राष्ट्राचे भवितव्य, अवलंबून असते. स्वामी विवेकानंदांनी म्हटले की, सुख आणि दुख दोघेही आपले महान शिक्षक आहेत. सुख आणि दुःख माणसाच्या आत्म्यासमोरून जाताना त्यावर नाना प्रकारची चित्र अंकित करीत असतात आणि त्या चित्र समष्टीच्या फळासच आपण माणसाचे चारित्र्य म्हणत असतो. आणि हे चारित्र्य कर्मांनी घडविले जात असते. म्हणून प्रत्येकाने आपला स्वतःचा आदर्श निवडून तोच जीवनात फलद्रूप करण्याचा यत्न करणे उचित. दुसऱ्या एखाद्याचा आदर्श घेऊन आपले चरित्र घडविण्याचा खटाटोप करत बसण्यापेक्षा स्वतःच प्रयत्नाची शिकस्त करावी तात्पर्य चांगले कर्म आपल्याला आदर्श बनविते. (कर्मयोग- स्वामी विवेकानंद)

आपले जीवन अमूल्य आहे. त्याचा उपयोग योग्य दिशेने आणि नीट केला पाहिजे. वर्तमान क्षणाचा योग्य उपयोग कसा होऊ शकतो. त्याच्या सूचनाही तुकोबा करतात ते म्हणतात नेहमी निरंतन सज्जन संगतीत राहण्याचा यत्न करावा. तुकोबांनी चारित्र्याचा संबंध आपल्या चित्ताशी जोडला आहे. चारित्र्य चांगले तर लोक आपोआपच आकृष्ट होतात, म्हणून तुकोबा सांगतात,

"चित्त शुद्ध तरी मित्र होती । व्याघ्र हीन स्वाती सर्प तया ।१।

विष ते अमृत आघात ते हित । अकर्तव्य तीत होय त्यासी ।२।

आपले चित्त जर शुद्ध असेल तर शत्रूही आपले मित्र होतात कोणाबद्दलही आवड किंवा द्वेष नसावा. अशा ना कोणीही त्रास देत नाही असा गृहस्थ समाजप्रिय गणला जातो. त्यांच्याबद्दल आत्यंतिक आदरभाव समाजमनामध्ये निर्माण होत असतो. असे तुकोबा कळवळ्ीने मांडतात.

## समारोप

मध्ययुगीन कालखंडात बहुतांशी राजेशाही पद्धत रूढ होती. कायदा नावाचा प्रकार अस्तित्वात नव्हता. समाज हा शक्यतो ज्या त्या धर्मनिती नियमानुसार, धार्मिक तत्त्वानुसार जो तो वागण्याचा प्रयत्न करत होता. माणसामध्ये अन्याय सहन करण्याची वृत्ती होती अशा काळात तत्त्वज्ञानप्रधान व धर्मप्रधान साहित्याची निर्मिती झाली अशा साहित्यामधून लोकांना भक्तिप्रवण साहित्यातून कर्मकांडाविरूद्ध विचारप्रणाली पुढे येऊ लागली. मोक्ष व मुक्तीसारख्या कल्पना समाजात रूढ होत्या. अशा समाजाला धार्मिक पद्धतीनेच एक नवा विचार, दृष्टिकोन देण्याचे कार्य संतानी केले. संत तुकोबानी आपल्या अभंगातून जग, जीवन, जगदीशाचे स्वरूप मांडून आदर्श जीवनाचा अर्थ समजावून सांगितला. कर्मानेच माणूस मोठा होतो चांगले कर्म मनुष्याला तेजस्वी बनविते. गृहस्थ आश्रमात संपत्ती आदि ऐहिक सुखावर भरवास न ठेवता । सुख-दुःख दोन्ही जीवनात अनुषंगिक आहेत नेहमी सावध राहून आपले जे खरे उद्दिष्ट आहे. तिकडे जायला पाहिजे असे सांगून तुकोबांनी एकूणच समाजमन बदलण्याचे कार्य अभंगवाणीतून केले आहे. आजही जीवनाची उकल सोडविण्यासाठी अभंग आपले मार्गदूत बनतात.

संदर्भ सूची


१) विनोबा - तुका आकाशाएवढा, परंधाम प्रकाशन, पवनार, मार्च २०१३

२) संपा. श्री. किर धनंजय - महात्मा फुले समग्र वाड्मय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

३) संपा. दिवाकर अनंत धैसास - सार्थ श्री तुकाराम गाथा

४) नेमाडे भालचंद्र - तुकाराम, साकेत प्रकाशन, २०१३

५) भोळे भास्कर - महात्मा जोतीराव फुले, सतीश ॲकडमी, २०१३

६) डॉ. मोरे सदानंद - प्रसादाची वाणी, अर्थात तुका म्हणे, सकाळ

७) डॉ. पेंडसे शं.दा - साक्षात्कारी संत तुकाराम, कॉन्टीनेंटल प्रकाशन, पुणे

८) संपा. डॉ. सानप वसंत - स्वामी विवेकानंद चिंतन आणि चर्चा, पृ. २०१५

९) स्वामी विवेकानंद - कर्मयोग